पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी- ४११ ०१८
मा. विधी समिती
कार्यपत्रिका क्रमांक : १२

**सभावृत्तांत**

दिनांक : १९ / १० / २०१२ वेळ : दुपारी ३ :०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. विधी समितीची पाक्षिक सभा शुक्रवार दिनांक १९ / १० / २०१२ रोजी दुपारी ३:०० वाजता महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेत खालील सन्मा. सदस्य उपस्थित होते.

१) मा. प्रसाद शेट्टी - सभापती
२) मा. पहलानी गुरुबक्ष किशनदास
३) मा. ननवरे जितेंद्र बाबा
४) मा. सुपे आशा रविंद्र
५) मा. ॲड.नितीन ज्ञानेश्वर लांडगे
६) मा. शितोळे शैलजा बाबुराव
७) मा. नेटके सुमन राजेंद्र
८) मा. विनोद जयवंत नढे
९) मा. आल्हाट धनंजय मुरलीधर

या शिवाय मा.सावंत - सह आयुक्त, मा.चाकणकर - प्र.नगरसचिव, मा.कांबळे - प्रशासन अधिकारी हे अधिकारी उपस्थित होते.

----------

**उपस्थित सन्मा. सदस्यांचे संमतीप्रमाणे खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजात दखल करुन घेणेत आले.**

विषय क्रमांक २) प्रभाग क्र.४० मधील एच.ए.कॉलनीमध्ये सुविधा देणेबाबत - मा.जितेंद्र ननवरे, मा.विनोद नढे यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक ३) इंद्रायणीनगर मधील मिनी मार्केट इमारतीचे आजुबाजूस पेव्हींग ब्लॉक बसविणेबाबत - मा.विनोद नढे, मा.जितेंद्र ननवरे यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक ४) रस्ता विकसित करणेबाबत - मा.जितेंद्र ननवरे, मा.विनोद नढे यांचा प्रस्ताव.

----------

**दिनांक ०५/१०/२०१२ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्र. ११) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.**

----------

ठराव क्रमांक :- ७० विषय क्रमांक :- १
दिनांक :- १९/१०/२०१२ विभाग :- प्रशासन विभाग
सुचक : मा. नितीन लांडगे अनुमोदक :- मा. जितेंद्र ननवरे
संदर्भ :- मा. महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.प्रशा/१/कावि/१०९८/२०१२, दि.०८/१०/२०१२

विषय - श्री. प्रमोद भिमराव भोसले, उपसंचालक, वित्त व लेखा सेवा (वरिष्ठ) गट-अ यांचे मुख्यलेखापाल, पिंपरी चिंचवड महानगरपालिका या पदावर प्रतिनियुक्तीने केलेल्या नेमणूकीस मान्यता मिळणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक १ चा विचार पुढील सभेच्यावेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक :- ७१ विषय क्रमांक :- २
दिनांक :- १९/१०/२०१२
सुचक :- मा. जितेंद्र ननवरे अनुमोदक :- मा. विनोद नढे
संदर्भ :- मा. जितेंद्र ननवरे, मा.विनोद नढे यांचा प्रस्ताव -

प्रभाग क्र.४० खराळवाडी प्रभागात एच.ए.कॉलनीचा भाग आहे. तेथे एच.ए.कंपनी मुलभूत सुविधा देण्यास असमर्थ आहे. तेथे दहा ते पंधरा हजारापेक्षा जास्त नागरिक वास्तव्यास आहेत. ते मुलभूत सेवा सुविधा पासून वंचित असून त्यामुळे तेथील नागरिकांना नाहक त्रास होत असल्याने त्या ठिकाणी नागरी सुविधा देण्याबाबत प्रशासनाने निर्णय घेणेची कार्यवाही करावी. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक :- ७२ विषय क्रमांक :- ३
दिनांक :- १९/१०/२०१२
सुचक :- मा. विनोद नढे अनुमोदक :- मा. जितेंद्र ननवरे
संदर्भ :- मा.विनोद नढे, मा. जितेंद्र ननवरे यांचा प्रस्ताव -

इंद्रायणीनगर, भोसरी येथे से.नं.२ मध्ये प्राधिकरणामार्फत बांधण्यात आलेल्या मिनी मार्केट इमारतीचे आजूबाजूस पेव्हींग ब्लॉक बसविणेस त्यासाठी येणा-या प्रशासकीय खर्चास मान्यता देणेत येत आहे. तसेच सदरचे काम वॉर्ड क्र.२४ इंद्रायणीनगर मध्ये मिनी मार्केट परिसरात फुटपाथ करणे व दुरुस्तीची कामे करणे (निविदा क्र. जी / ३ / २३ / १२ / ११ / २०११ - १२) या कामातून करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक :- ७३ विषय क्रमांक :- ४

दिनांक :- १९/१०/२०१२

सुचक :- मा. जितेंद्र ननवरे अनुमोदक :- मा. विनोद नढे

संदर्भ :- मा. जितेंद्र ननवरे, मा.विनोद नढे यांचा प्रस्ताव -

प्रभाग क्र.८९ मधील ४५ मीटर रस्त्यापासून २४ मी. रस्त्यास मिळणारा १२ मी. रस्त्याची जागा ताब्यात मिळण्याच्या कार्यवाहीस कालावधी लागत आहे. सबब प्रभाग क्र. ८९ मधील ४५ मी. रस्त्यापासून २४ मी. रस्त्यास मिळणारा रस्ता विकसित करणे ( शॉपिंग सेंटर जवळचा रस्ता ) निविदा क्र.६२/३५/४/२०११-१२ निविदा र.रु.३७,३४,८२७/- या कामामधून पिंपळे निलख जुना वॉर्ड क्र. ८९ नविन प्रभाग क्र. ५४ मधील ताब्यात आलेले उर्वरित रस्त्याचे जागेत कामाची निकड लक्षात घेता रस्त्याची कामे करुन घेण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.**

**( प्रसाद शेट्टी )**
सभापती
विधी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक - नस/४/कावि/ १३८३ /२०१२
दिनांक - १९ / १० / २०१२ चे लगत

प्र. नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८

प्रत - सर्व संबंधीत शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.